

शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित व
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नीत

# शंकरराव मोहिते महाविद्यालय

अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर



## माहिती पुस्तिका

सन २०२५-२६



# अध्यक्षांचे मनोगत

**प्रिय विद्यार्थी मित्र व पालक,**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार आणि मजूरांच्या मुलां-मुलींना शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने १९४८ साली शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. शहात्तर वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीनंतर या संस्थेने सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस व माढा तालुक्यांसह पुणे व रायगड जिल्ह्यात शाखा सुरू केल्या आहेत. सध्या संस्थेच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, कला, वाणिज्य, विज्ञान पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय, कृषी महाविद्यालय (पदविका व पदवी), औषध निर्माणशास्त्र (पदविका व पदवी), शिक्षणशास्त्र महाविद्यालय (पदवी) अशा विविध शाखांमधून ज्ञानदानाचे कार्य अविरत सुरू आहे.

संस्थेने राबविलेल्या आनंदयात्रा, विज्ञानयात्रा, वाद्यवृंद, गौरव भारतीय लोककलेचा, जाणता राजा महानाट्य, दिल्लीच्या राजपथ धरतीवर प्रजासत्ताक दिनाचे आयोजन, रयतेचा राजा : राजा शिव छत्रपती महानाट्य, प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह नृत्य स्पर्धा तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दूरदर्शन मालिका व चित्रपट क्षेत्रात कलाकार, दिग्दर्शक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. संस्थेच्या विविध शाखेतील कनिष्ठ महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण करून अनेक विद्यार्थी वैद्यकीय व्यवसायात कार्यरत आहेत. तसेच अभियंता, शास्त्रज्ञ व चार्टर्ड अकौंटंट झाले आहेत. संस्थेच्या विविध शाखेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी ऑस्ट्रेलिया, जपान, रशिया, कोरिया, इंग्लंड, इत्यादी राष्ट्रात संशोधन करीत आहेत.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाने सुरू केलेल्या नेट व सेट मार्गदर्शन केंद्रातून अनेक विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन आज अनेक विद्यार्थी तहसीलदार, नायब तहसीलदार, कृषी अधिकारी, पोलिस अधिकारी, न्यायाधीश, सरकारी वकील इत्यादी उच्च पदांवर कार्यरत आहेत. शंकरराव मोहिते महाविद्यालयातील क्रीडा व राष्ट्रीय छात्र सेना योजनातून घडलेले अनेक विद्यार्थी आज पोलीस तसेच मिलीटरी सर्व्हिसेस मध्ये नियुक्त झाले आहेत. संस्थेच्या विविध शाखेतून पुरविण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधा व अर्थसहाय्यामुळे राज्य व राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. यु.जी.सी.च्या अनुदान व संस्था हिस्सा खर्च करून इनडोअर स्टेडियम बांधून खेळाडूंना अद्ययावत सुविधा देण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. तसेच ग्रामीण भागातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून यु,जी.सी. अनुदान व संस्था हिस्सा खर्च करून ४५० क्षमतेचे अद्ययावत महिला वसतीगृह बांधण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शंकरराव मोहिते महाविद्यालयास पदार्थविज्ञान, कणायुशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, मराठी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, वाणिज्य व इंग्रजी या विषयांचे संशोधन मार्गदर्शक उपलब्ध आहेत. संशोधन केंद्र मंजूर केल्यामुळे उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पीएच.डी. करण्याची संधी मिळाली असून आज अखेर ४३ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून अनेक विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टीकोन निर्माण होऊन समाजाभिमुख कामांमध्ये त्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा. श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व मा. श्री. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संस्थेचे सर्व संचालक मंडळ, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या अथक प्रयत्नातून तसेच संस्थेच्या माध्यमातून विविध शाखेत उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा पुरवून सक्षम युवा पिढी निर्माण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे.

धन्यवाद !

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील**
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज

**प्रेरणास्थान**



**मा.श्री. विजयसिंह मोहिते-पाटील**
माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मार्गदर्शक**



**मा.श्री.जयसिंह मोहिते-पाटील**
मार्गदर्शक तज्ञ संचालक,
शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज

## Motto

*Tewo Sada Dnyanamaya Pradeep*

*Let the lamp of knowledge enlighten forever.*

## Vision

*To become one of the leading institutes of higher education with a view to foster global competencies among students by making use of technology, value system and finally contributing to the National development.*

## Mission

*To impart quality higher education to the wards of farmers, workers, laborers and rural down-trodden masses of the area and disseminate knowledge for academic excellence, moral character and versatile personality development.*

## Goals

- *To impart quality higher education through traditional and innovative teaching learning practices.*
- *To be self reliant and self renewing to meet the changing global challenges.*
- *To make relentless efforts to provide education to satisfy the needs of contemporary society.*
- *To inculcate the spirit of nationalism, social responsibility, awareness for good moral character and cultural values among the learners.*
- *To provide conducive environment to pursue the research and promote extension activities for the faculty and the students as well.*



# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी व पालक,

सप्रेम नमस्कार !

शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात आपले मन:पुर्वक स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आमचे महाविद्यालयात उच्च शिक्षण घेताना पुस्तकी ज्ञानाबरोबरच नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी अनेक नवोपक्रम राबविले जातात.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी १९६७ साली अकलूज येथे शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या मुलांसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी या उदात्त हेतूने शंकरराव मोहिते महाविद्यालयाची स्थापना केली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देणे, त्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांचे व्यक्तीमत्व संपन्न करणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना स्वत:च्या पायावर समर्थपणे उभे करणे यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा, कला इत्यादीच्या माध्यमातून नियोजनबध्द प्रयत्न केले जातात.

महाविद्यालयाने खेळाडूंसाठी भव्य क्रीडांगण, इंडोअर स्टेडियम, सर्व प्रकारचे अद्ययावत क्रीडा साहित्य, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी संस्था स्तरावर बक्षीस योजना व महाविद्यालय स्तरावर क्रीडा शिष्यवृत्ती इत्यादीमुळे आज शंकरराव मोहिते महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजसेवेतील महाविद्यालयाच्या कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाने २००२-०३ व २००६-०७ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन महाविद्यालयाचा गौरव केला आहे. महाविद्यालयाने महिलांसाठी निर्माण केलेल्या सुविधा आणि त्यांच्या सुरक्षेसाठी व उन्नतीसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांचा विचार करून महाराष्ट्र शासनाने २०१२-१३ चा 'जागर जाणीवांचा' सोलापूर जिल्हा स्तरावरील प्रथम पुरस्कार रुपये १ लाख, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ स्तरावरील प्रथम पुरस्कार रुपये २ लाख, सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन महाविद्यालयाच्या कार्याचा गौरव केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने २०१८-१९ व २०२२-२३ मध्ये केलेल्या शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परिक्षण (Academic and Administrative Audit) प्रणाली अंतर्गत झालेल्या मूल्यांकनात महाविद्यालयास अ दर्जा (A Grade - Excellence with Appreciation Letter) प्राप्त झाला आहे. तसेच सोलापूर विद्यापीठाने २०१६ चा ग्रामीण भागातील उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार देऊन महाविद्यालयाचा गौरव केला आहे. महाविद्यालयास २०२१ मध्ये नॅक बेंगलोर यांनी मुल्यांकन करून B++ ग्रेड दिला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा उत्कृष्ठ शैक्षणिक संस्था पुरस्कार सन २०२०-२१ मिळाला आहे. यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांना मनापासून धन्यवाद !

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) अनेक छात्र सैनिकांनी दिल्ली येथे होणाऱ्या आर. डी. परेडमध्ये सहभाग नोंदवून महाविद्यालयाचा झेंडा दिल्ली पर्यंत फडकविण्याचे काम कौतुकास्पद आहे. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये नोकऱ्या तसेच उद्योग व्यवसायामध्ये भरीव यश संपादन करत आहेत. दर वर्षी विविध विषयातील विद्यार्थी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात गुणवत्ता यादीत भरघोस यश संपादन करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकत आहेत.

सांस्कृतिक विभागाच्या कामगिरीचा आलेख सतत वाढतच गेल्याचे दिसते. युवा महोत्सवात महाविद्यालयाने प्रथम, व्दितीय, तृतीय पुरस्कार मिळवताना वैयक्तिक पातळीवर अभिनयाची गोल्डन बॉय, गोल्डन गर्ल असे बहुमान मिळविले आहेत. या क्षेत्रात महाविद्यालयास एक उंचीवर नेण्याचे काम सांस्कृतिक विभागाने केलेले आहे. माळशिरस तालुक्यातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पुढे जावेत यासाठी महाविद्यालयाने नेट सेट गायडन्स सेंटर, करिअर अॅण्ड कौन्सिलिंग सेल, विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ पुरस्कृत विविध व्यवसायाभिमुख पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले आहेत. भारताला ज्ञानाधिष्ठित महासत्ता बनविण्याच्या दिशेने आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP 2020 धोरणानुसार अभ्यासक्रम राबविण्यात आले आहेत.

महाविद्यालयात आज २३ प्राध्यापक पीएच.डी. आहेत. त्यांच्या संशोधनाचा फायदा या परिसरातील विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून विद्यापीठाच्या मान्यतेने कणायुशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पदार्थविज्ञान, भूगोल, वाणिज्य, अर्थशास्त्र, मराठी, इतिहास व इंग्रजी विषयात पीएच.डी. मार्गदर्शकांची सोय महाविद्यालयाने केली आहे. आज पर्यंत ४३ विद्यार्थ्यांनी पीएच.डी पदवी संपादन केली आहे. अकलूज परिसरातील व माळशिरस तालुक्यातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुला मुलींसाठी महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर, हवेशीर इमारत, भव्य क्रीडांगण, अत्याधुनिक क्रीडा साहित्य, जिम, अद्ययावत प्रयोगशाळा, भव्य व समृध्द ग्रंथालय, ई-लायब्ररी, महाविद्यालय परिसरात बँक ऑफ इंडियाची शाखा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह, भव्य इनडोअर स्टेडियम ही महाविद्यालयाची वैशिष्ट्ये होत.

वाड्यावस्त्यावर राहणाऱ्या मुलींची सोय व्हावी म्हणून जवळ जवळ साडेचार कोटी रूपये पेक्षा जास्त खर्च करून मुलींचे अद्ययावत वसतीगृह बांधले आहे. आर्थिक अडचणीमुळे परिसरातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून कमवा आणि शिका योजना, गरीब विद्यार्थी सहाय्य निधी, प्रवेश फीमध्ये सवलत, बुक बँक, बक्षीसे, इत्यादी माध्यमातून गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली जाते. दर वर्षी प्रत्येक विद्यार्थ्याचा रूपये दहा लाखांचा अपघाती विमा उतरण्यात येतो.

आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्ता कौशल्य आणि मूल्यधिष्ठित शिक्षणाची आवश्यकता अधिक असल्याने विद्यार्थ्यांच्या बौध्दिक आणि नैतिक उन्नतीनासाठी आमचे महाविद्यालय अधिक प्रयत्नशील असते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्वल करावे यासाठी आमचे महाविद्यालय अविरतपणे प्रयत्न करीत असते. त्याचबरोबर सकारात्मक विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक संधी प्राप्त करून दिल्या जातात. आमचे महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची व नवजीवनाची निश्चितपणे सुरूवात होईल याची मी अपेक्षा करतो आणि आपणा सर्वांना शुभेच्छा देतो.

**प्रा. एस. के. टिळेकर**
प्राचार्य
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- ✻ अनुभवसंपन्न व व्यासंगी शिक्षक व प्राध्यापक वृंद
- ✻ समृध्द ग्रंथालय, रात्र अभ्यासिका व बुक बँक सुविधा
- ✻ ई-बुक व ई-जर्नल्स् सुविधा
- ✻ सुसज्ज व अद्ययावत प्रयोगशाळा
- ✻ मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतीगृह
- ✻ ४०० मीटर ट्रॅकसह भव्य इनडोअर स्टेडियम, विविध क्रीडा प्रकारांची सोय.
- ✻ अद्ययावत जिम.
- ✻ राष्ट्रीय छात्र सेवा - मुलांचे व मुलींचे युनिट
- ✻ राष्ट्रीय सेवा योजना - कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय युनिट
- ✻ सांस्कृतिक विभाग
- ✻ मराठी, हिंदी व इंग्रजी वाङ्मय मंडळ, भाषाभगिनी मंडळ
- ✻ भूगोल मंडळ, रत्नशंकर निसर्ग मंडळ, अर्थशास्त्र मंडळ
- ✻ इंग्लिश स्पीकर्स क्लब, इलेक्ट्रॉनिक्स क्लब
- ✻ विद्यार्थी पालक-शिक्षक संघ
- ✻ सामान्यज्ञान, एमटीएस व ऑलिंपियाड, आयएपीटी परीक्षांचे आयोजन
- ✻ शैक्षणिक सहलींचे/परिसर भेटींचे आयोजन
- ✻ महाराष्ट्र विवेक वाहिनी व अंध:श्रध्दा निर्मूलन समिती
- ✻ यु.जी.सी. पुरस्कृत व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम
- ✻ नेटवर्क रिसोर्स सेंटर व विविध विभागात इंटरनेट सुविधा
- ✻ गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना
- ✻ नेट/सेट मार्गदर्शन केंद्र
- ✻ विशेष गुणवत्ता पारितोषिके, क्रीडा, एन.सी.सी. व सांस्कृतिक शिष्यवृत्ती
- ✻ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर ॲण्ड कौन्सिलींग सेंटर
- ✻ उपहार गृह, लेडिज कॉमन रूम, जनरेटर सुविधा
- ✻ मागासवर्गीय शिष्यवृत्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती, शाहू शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, स्वातंत्र सैनिक शिष्यवृत्ती, एकलव्य शिष्यवृत्ती, सारथी, महाज्योती शिष्यवृत्ती
- ✻ प्राथमिक शिक्षक (पी.टी.सी.) माध्यमिक शिक्षक (एस.टी.सी.) माजी सैनिक, इत्यादी सवलती
- ✻ इंटरनेट, एल.सी.डी. चार्टस्, मॉडेल्स, सी.डी. व्हीडीओ/ओडिओ कॅसेट्स, इ. शैक्षणिक साहित्य
- ✻ स्वतंत्र सेमिनार हॉल
- ✻ महाविद्यालय परिसरात बँक व एटीएम सुविधा (बँक ऑफ इंडिया)
- ✻ राष्ट्रीय सेवा योजना २००२-०३ व २००६-२००७ चा महाराष्ट्र शासनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार
- ✻ जाणीव जागरांचा या उपक्रमास महाराष्ट्र शासनाचा सन २०१२-१३ चा जिल्हास्तरीय रु. १ लाख तसेच विद्यापीठस्तरीय रु. २ लाखाचा प्रथम पुरस्कार, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह.
- ✻ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र (बी.ए./बी.कॉम.)
- ✻ शैक्षणिक व प्रशासकिय लेखा परीक्षण - 'अ' दर्जा
- ✻ सोलापूर विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार (ग्रामीण विभाग) २०१६
- ✻ कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- ✻ पु.अ. होळकर सो. वि. सो. यांचा उत्कृष्ठ शैक्षणिक संस्था पुरस्कार २०२०-२१









## पदव्युत्तर शिक्षणाची सोय

- **एम. ए.** - **इंग्रजी, हिंदी व इतिहास**
- **एम. एस्सी.** - **इलेक्ट्रॉनिक्स, रसायनशास्त्र** (प्रस्तावित) **ॲग्रो केमिकल्स ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट**
- **पीएच. डी.** - **इलेक्ट्रॉनिक्स, इंग्रजी, हिंदी व इतिहास**

## महाविद्यालयाच्या वेळा

वरिष्ठ महाविद्यालय
- कला स. ८.०० ते दु. २.१०
- विज्ञान स. ९.१० ते सायं. ५.३०
- वाणिज्य स. ८.०० ते दुपारी २.१०
- पदव्युत्तर स. १०.१० ते सायं. ५.३०
- कनिष्ठ महाविद्यालय स.८ ते सायं. ५.२०
- एम.सी.व्ही.सी. स. ८ ते दुपारी १
- रात्र अभ्यासिका सायं ७ ते ११
- य.च.म.मु.वि. स. ११ ते दुपारी २

✻ कार्यालय सकाळी १०.३० ते सायं. ५.३० ✻

## प्रवेशासंबंधी सूचना

- वृध्दी सॉफ्टवेअरमधून प्रवेश होत असताना विद्यार्थ्यांनी स्वत:च्या नावाचा इमेल आयडीचा वापर करावा तसेच रजिस्टर्ड मोबाईल कायम स्वरूपी ठेवावा त्यामध्ये बदल करू नये. प्रवेश पूर्ण झाल्यावर मिळणारा रजिस्ट्रेशन नंबर पुढील ३ वर्षांसाठी लागत असल्याने तो व्यवस्थित लिहून ठेवावा. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचून विषयांची निवड करावी. ऑनलाईन प्रोसेसमुळे एकदा निवडलेले विषय परत बदलता येणार नाहीत.
- प्रवेश रद्द करावयाचा असल्यास महाविद्यालयास तसे लेखी कळवावे. प्रवेश रद्द करताना नियमानुसार शुल्क भरावे लागेल.
- सी.बी.एस.ई. बोर्डातून १० वी पास होऊन ११ वी त प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्डाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कक्षेतील इतर महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या महाविद्यालयाचे ट्रान्सफर सर्टिफिकेट (टी.सी.) तर सोलापूर विद्यापीठ कक्षेबाहेरील महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थलांतर दाखला (मायग्रेशन टी.सी.) सादर करावा लागेल.
- जम्मू व काश्मीरच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २ जादा जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.
- इ. ११ वी, बी.ए. भाग-१, बी.कॉम. भाग-१ व बी.एस्सी. भाग-१, एम.ए. भाग-१, एम.एस्सी. भाग-१ व पी.एच.डी. या वर्गात प्रवेश घेताना विद्यार्थ्याने मूळ गुणपत्रक, शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन सत्य प्रती प्रवेश अर्जास जोडाव्यात.
- गतवर्षीच्या विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात प्रवेश घेते वेळी आधीच्या परीक्षेच्या गुणपत्रकाच्या दोन सत्य प्रती प्रवेश अर्जास जोडाव्यात.
- सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, अपंग, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक सैनिक यांची मुले व इतर मागासवर्गीय व विशेष प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/शुल्कात सवलत मिळते अशा शिष्यवृत्ती/सवलतींसाठी ठराविक मुदतीच्या आत विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांस प्रवेश देणे/नाकारणे/दिलेला प्रवेश रद्द करणे हा अधिकार प्राचार्यांना राहिल.
- महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश सक्तीचे आहे.
- वर्ग/प्रयोगशाळा/ग्रंथालया मध्ये मोबाईल बंद ठेवावा.
- परीक्षेत मोबाईल घेऊन येऊ नये.
- वाहने ठरवून दिलेल्या जागेतच लावावीत.

**विशेष सूचना** विद्यापीठाच्या परीक्षा फार्म भरण्याच्या, परिक्षेच्या, शिष्यवृत्ती फार्म भरण्याच्या तारखा त्याचप्रमाणे क्रीडा विभाग, ग्रंथालय, एन.एस.एस., एन.सी.सी., विविध स्तरावरील स्पर्धा याविषयीचे नियम व सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावल्या जातील त्याच बरोबर व्हॉट्सअप ग्रुप वर पाठविल्या जातील. सूचना फलक पाहण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे. हे नियम व सूचना न पाहण्यामुळे जर विद्यार्थ्यांचे नुकसान झाले तर त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## नियम व अटी

- महाराष्ट्र रॅगिंग व प्रतिबंध कायदा १९९९ नुसार महाविद्यालय परिसरामध्ये किंवा महाविद्यालयाबाहेर रॅगिंग करणे कायद्यानुसार दाखलपात्र गुन्हा आहे. या कायद्यातील नियम व तरतदींचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयातून दोन वर्षांपर्यंत करावास आणि रुपये दहा हजारापर्यंत दंड होऊ शकतो. या कायद्यानुसार दोषी ठरणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयातून निलंबित करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यास पाच वर्षांपर्यंत इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेता येणार नाही.
- प्रत्येक विद्यार्थ्याने वेळापत्रकानुसार आपल्या सर्व विषयांच्या तासिकांना नियमितपणे वेळेवर हजर राहिले पाहिजे. ७५% पेक्षा कमी हजेरी असेल तर त्या विद्यार्थ्याला मिळणाऱ्या सर्व सवलती रद्द केल्या जातील व त्याला वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही याची नोंदी घ्यावी.
- महाविद्यालय परिसरात, वर्गात, भिंतीवर अथवा ग्रंथालयात स्वच्छता ठेवण्याची काळजी घ्यावी.
- वर्ग चालू असताना विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात फिरू नये.
- प्रत्येक विद्यार्थ्याजवळ महाविद्यालय परिसरात ओळखपत्र असणे तसेच गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. नसल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल.
- वर्ग/प्रयोगशाळा/ग्रंथालय मोबाईलचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल.
- विद्यार्थ्यांना प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी यांच्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.
- सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तके काळजीपूर्वक वापरावीत व ती ग्रंथालयाच्या नियमानुसार वेळच्यावेळी परत करावीत.
- महाविद्यालय व संस्थेशी संबंधीत असलेली कोणतीही माहिती अथवा वृत्त प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय वृत्तपत्रांमध्ये अथवा अन्यत्र प्रसिध्दीस देवू नये.
- परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या किंवा महाविद्यालयात गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात या महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.
- एखाद्या विद्यार्थ्याचे वर्तन महाविद्यालयाच्या दृष्टीने अयोग्य किंवा हानिकारक आहे असे प्राचार्यांचे मत झाल्यास नियमानुसार त्या विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयातून कमी करण्यात येईल.
- महाविद्यालयातील निवडणुका, वार्षिक स्नेह संमेलन व इतर समारंभ शिस्तीने व शांततेने यशस्वी करण्याची जबाबदारी प्रत्येक विद्यार्थ्याची आहे. या संदर्भात बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल.
- विद्यापीठ नियमाप्रमाणे महाविद्यालयची विद्यार्थी संसद गठीत केली जाईल.

## वरिष्ठ महाविद्यालयात (Senior College) पदवी स्तरावर शिकविले जाणारे अभ्यासक्रम व विषय :

### कला शाखा (Arts Faculty)

**B.A.-I** NEP 2020

1. **DSC** - Students should opt any three subjects from following groups (one from each Mx group) for both semester.
   - M1-Marathi/Economics/Political Science
   - M2- English/History/Psychology/Physical Education
   - M3- Hindi/Geography/Linguistics
2. **GE/OE** - Students should offer any one subject form following for both semester: Marathi (Compulsary)/Scientific Method(SM)
3. **SEC** - Students should offer any one subject from following for both semester : Marathi/Hindi/English/History/Geography/Economics
4. **AEC**-$L_1$- English for both semester
5. **IKS** - Generic Related for Sem I only
6. **VEC** - Indian Constitution and Democracy for Sem I - Environment Studies for Sem II
7. **CC** - Students should offer any one subject from following for Sem II - NSS/NCC/Cultural/Sports

### विज्ञान शाखा (Science Faculty)

**B.Sc.-I** NEP 2020

1. **DSC** - Students should offer any one Group of three subject from available groups at admission desk for both semester.
2. **GE/OE** - Students should offer any one subject form following for both semester: Physics/Chemistry/Botany/Zoology/Electronics/Mathematics/Statistics/Geography
3. **SEC** - Students should offer any one subject from following for both semester : Physics/Chemistry/Botany/Zoology/Electronics/Mathematics/Statistics/Geography
4. **AEC**-$L_1$-English for both semester
5. **IKS** - Indian Knowledge System for Sem I only
6. **VEC** - Indian Constitution and Democracy for Sem I - Environment Studies for Sem II
7. **CC** - Students should offer any one subject from following for Sem II - NSS/NCC/Cultural/Sports

### वाणिज्य शाखा (Commerce Faculty)

**B.Com.-I** NEP 2020

1. **DSC** - Students should offer any one Group of three subject from following for both semester.
   Group I- Financial Accounting/Fundamentals of Business Management/Business Micro Economics
   Group II- Financial Accounting/Fundamentals of Business Management/Fundamentals of Insurance
   Group III- Financial Accounting/Fundamentals of Business Management/Business Statistics
2. **GE/OE** - Students should offer any one subject form following for Sem. I - Basic of commerce/Principles of Marketing
3. **GE/OE**- Students should offer any one subject from the following for Sem.II - Accounting for Everyone / Digital Marketing
4. **SEC** - Students should offer any one subject from following for semester I : Managerial Skills/Introduction to Share Market
5. **SEC** - Students should offer any one subject from following for Semester II : Salesmanship&Sales Management/Share Market Trading
6. **AEC**-$L_1$- English Communication for both semester
7. **IKS** - Indian Knowledge System for Sem I Ancient Indian Management/History of Indian Economic Thoughts
8. **VEC** - Indian Constitution and Democracy for Sem I - Environment Studies for Sem II
9. **CC** - Students should offer any one subject from following for Sem II - NSS/NCC/Cultural/Sports

### कला शाखा (Arts Faculty)

**B.A.-II** NEP 2020

AS PER NEP 2020 GUIDELINES

### विज्ञान शाखा (Science Faculty)

**B.Sc.-II** NEP 2020

AS PER NEP 2020 GUIDELINES

### वाणिज्य शाखा (Commerce Faculty)

**B.Com.-II** NEP 2020

AS PER NEP 2020 GUIDELINES

**B.A.-III**

**A) Compulsory :** English

B. Special Subjects:
1) English
2) Marathi
3) Hindi
4) History
5) Geography
6) Economics
(Any one of the above subjects)

**C) Add-on Course :**
Certificate course

**B.Sc.-III**

**A) Compulsory :** English

B. Special Subjects:
1) Physics
2) Electronics
3) Chemistry
4) Botany
5) Zoology
6) Mathematics
(Any one of the above subjects)

**C) Add-on Course :**
Certificate course

**B.Com.-III**

1) Business Economic Development
2) Co-operative Development
3) Business Regulatory Framework
4) Modern Management Practices
5) Advanced Accountancy Paper-I
6) Advanced Accountancy Paper-II
(Any one of the above subjects)

**Add-on Course :**
Certificate course

**DSC** : Discipline/Department Specific Course
**SEC** : Skill Enhancement Course
**AEC** : Ability Enhancement Course
**IKS** : Indian Knowledge System
**VEC** : Value Education Course
**GE/OE** : Generic Elective/Open Elective
**CC** : Co-curricular Course
**VSC** : Vocational Skill Enhancement Course
**FP** : Field Project
**CEP** : Community Engagement Programme

# कनिष्ठ महाविद्यालय, व्यवसाय अभ्यासक्रम व यु.जी.सी. पुरस्कृत उपक्रम

## इ. ११ वी व १२ वी कला (Arts)

**अ) आवश्यक :**

• इंग्रजी (निम्नस्तर) • मराठी (उच्चस्तर) • पर्यावरणशास्त्र

**ब) ऐच्छिक विषय :**

पुढील पैकी कोणतेही चार विषय निवडावेत.

१) हिंदी/अर्थशास्त्र २) भूगोल ३) इतिहास ४) मानसशास्त्र

## इ. ११ वी व १२ वी वाणिज्य (Commerce)

• मराठी • इंग्रजी • अर्थशास्त्र

• व्यापार संघटन • चिटणीसाची कार्यपध्दती

• पुस्तक पालन व लेखा कर्म • पर्यावरणशास्त्र

## इ. ११ वी व १२ वी विज्ञान (Science)

A व B संयुक्त ग्रुप :

• इंग्रजी (निम्नस्तर) • मराठी (उच्चस्तर) • भौतिकशास्त्र • रसायनशास्त्र • जीवशास्त्र • गणित

A ग्रुप :

• इंग्रजी (निम्नस्तर) • भौतिकशास्त्र • रसायनशास्त्र • गणित • इलेक्ट्रॉनिक्स (द्विलक्षी २०० गुण)

B ग्रुप :

• इंग्रजी (निम्नस्तर) • मराठी (उच्चस्तर) • रसायनशास्त्र • भौतिशास्त्र • जीवशास्त्र • कृषि विज्ञान व तंत्रज्ञान (१०० गुण) किंवा

• इंग्रजी • मराठी • रसायनशास्त्र • भौतिकशास्त्र • जीवशास्त्र • पशु विज्ञान (२०० गुण)

टीप: वरील प्रत्येक ग्रुपच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्र सक्तीचा आहे.

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम बी दर्जा (८४% गुण)

शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण विद्यार्थी - विद्यार्थीनींना खालील व्यवसाय अभ्यासक्रमांना आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.

## इ. ११ वी

• इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी • इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी

**आवश्यक विषय :** • इंग्रजी (१०० गुण) • मराठी (१०० गुण) • पायाभूत अभ्यासक्रम (१०० गुण) • पर्यावरण शास्त्र

**प्रवेश क्षमता : प्रत्येक ट्रेडसाठी ३०**

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

• इ. १२ वी नंतर बी.ए. भाग-१ / बी.एस्सी- भाग १ मध्ये प्रवेश घेता येतो अथवा स्वत:चा व्यवसाय सुरू करता येतो.

• केंद्र शासन पुरस्कृत +२ स्तरावरील उमेदवारी प्रशिक्षण योजना (अप्रेन्टिशीप स्कीम) लागू आहे. या योजनेअंतर्गत एका वर्षासाठी दरमहा रु. ९०० विद्यावेतन मिळते.

• मागेल त्याला प्रशिक्षण योजने अंतर्गत एस.सी. व एस.टी. च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची सोय.

• इ. ११ वी नंतर सुट्टीच्या कालावधीत १ महिना 'ऑन-दी-जॉब ट्रेनिंगची' व्यवस्था केली आहे.

• इ. १२ वी पास झाल्यावर 'व्होकेशनल टेक्निशियन' म्हणून केंद्र सरकारचे प्रमाणपत्र मिळते.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविले जाणारे उपक्रम

**• नेट / सेट मार्गदर्शन केंद्र**

सर्व विषयाच्या नेट/सेट परीक्षा तयारीसाठी तज्ञांची व्याख्याने, मार्गदर्शन, कार्यशाळा, भरपूर पुस्तके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट सुविधा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एका वर्षासाठी प्रवेश फी रु. २५०/- खुल्या संवर्गासाठी रु. ५००/-

- **डॉ. एस. यु. पवार** (समन्वयक)

**• करिअर अॅन्ड कौन्सिलिंग सेल**

तज्ञ व्यक्तिकडून विद्यार्थ्यांना करिअरबद्दल मार्गदर्शन करणे, शिक्षणातील नवीन वाटा, नवे अभ्यासक्रम, नोकरी संबंधी मार्गदर्शन व जाहिरातींची मोफत माहिती देणे.

- **डॉ. एस. यु. पवार** (समन्वयक)

**• नेटवर्क रिसोर्स सेंटर**

विद्यार्थी, शिक्षक व पालक तसेच समाजातील अन्य घटकांना इंटरनेटच्या माध्यमातून हवे ते ज्ञान मोफत उपल्बध करून देणे.

- **ग्रंथपाल श्री. डी.एस. पाटील** (समन्वयक)

**• इंग्रजी सुधार वर्ग :**

गरजू विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी सुधार वर्गाचे आयोजन करून इंग्लिश ग्रामर तसेच स्पोकन इंग्लिश व रायटिंग स्किल्स बाबत तज्ञांचे मार्गदर्शन. कालावधी ३ आठवडे व फी रु. ३००/-

- **डॉ. एच. के. आवताडे** (समन्वयक)

**• यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र :**

बी.ए. व बी. कॉम. भाग १,२ व ३

- **डॉ बी. एस. मुळीक** (समन्वयक)

## पदवी व पदव्युत्तर विभाग

**प्रवेश घेताना पेईंग विद्यार्थ्यांनी भरावयाच्या फी चा तपशील**

| | Admission Fee | Tution Fee | Library Fee | Extra-curricular Fee | Gym Fee | Laboratory Fee | Univ Medial Aid | College Development Fee | Yuvak Mahostav | Pro Rata | University Krida Mah. | Apatkalin Nidhi | Uni. Student Insurance | Uni. Development Fund | E. Suvidha | Magazine | Environment Science | Computer Training | Alumini Association | Fuel | Identity Card | Development Election & Good Governance | Eligibility | Registration Fee | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A. & B.Com. I | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 0 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 275 | 110 | 70 | 3759 |
| B.A. & B.Com. II | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 0 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 340 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 3644 |
| B.A. & B.Com III | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 0 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 3304 |
| B.Sc.I | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 170 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 275 | 110 | 70 | 3929 |
| B.Sc. II | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 170 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 340 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 3814 |
| B.Sc. III | 70 | 1088 | 680 | 45 | 205 | 170 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 3474 |
| M.A. I | 70 | 3150 | 680 | 45 | 205 | 0 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 80 | 70 | 5516 |
| M.A.II | 70 | 3400 | 680 | 45 | 205 | 0 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 5616 |
| M.Sc. I AGPM | 70 | 13860 | 680 | 45 | 205 | 2720 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 80 | 70 | 18946 |
| M.Sc. II AGPM | 70 | 14520 | 680 | 45 | 205 | 2720 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 19456 |
| M.Sc. I Elec. | 70 | 11340 | 680 | 45 | 205 | 5440 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 80 | 70 | 19146 |
| M.Sc. II Elec. | 70 | 12060 | 680 | 45 | 205 | 5440 | 15 | 105 | 165 | 85 | 38 | 15 | 118 | 105 | 85 | 70 | 0 | 205 | 70 | 70 | 70 | 0 | 0 | 0 | 19716 |

टीप : बी.ए.भाग-३ भूगोल विषयासाठी रु. २००/- प्रात्यक्षिक शुल्क भरणे आवश्यक आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून प्रतिपूर्ती न होणारी सर्व फी भरावी लागेल. पदवी व पदव्युत्तर विभागाच्या विनाअनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांना विद्यापीठ व शासनाने ठरवून दिलेली फी भरावी लागेल.

## कनिष्ठ महाविद्यालय व किमान कौशल्य अभ्यासक्रम

**प्रवेश घेताना पेईंग विद्यार्थ्यांनी भरावयाच्या फी चा तपशील**

| | Admission Fee | Tution Fee | Library Fee | Term Fee | College Internal Exam Fee | Laboratory Fee | Student Aid Fund | Gymkhana Fee | Extra Curricular Fee | Magazine Fee | Cycle Stand Fee | S.A.G. Fee | Identity Card Fee | Lab Maintainance | College Development Fund | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| XI, XII Arts/Com (Girls) | 00 | 00 | 10 | 00 | 00 | 00 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 240 |
| XI, XII Science (Girls) | 00 | 00 | 10 | 00 | 00 | 20 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 260 |
| XI Arts/Com. (Boys) | 16 | 192 | 10 | 32 | 198 | 00 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 678 |
| XII Arts/Com (Boys) | 18 | 216 | 10 | 36 | 148 | 00 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 658 |
| XI Science (Boys) | 16 | 192 | 10 | 32 | 198 | 70 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 748 |
| XII Science (Boys) | 18 | 216 | 10 | 38 | 148 | 70 | 10 | 50 | 30 | 50 | 20 | 20 | 50 | 00 | 00 | 728 |
| XI MCVC | 20 | 240 | 10 | 40 | 200 | 80 | 10 | 50 | 25 | 40 | 20 | 20 | 50 | 50 | 600 | 1455 |
| XII MCVC | 00 | 300 | 10 | 50 | 200 | 100 | 10 | 50 | 25 | 40 | 20 | 20 | 00 | 50 | 600 | 1475 |

# Department-wise faculty of Senior College

| Name of the Department & Teacher | Qualifications | Designation |
|---|---|---|
| **PRINCIPAL** | | |
| Prof. Tilekar S.K. | M.Sc.M.Phil.Ph.D. | Principal |
| **English (U.G.&P.G.)** | | |
| Dr. Awatade H.K. | M.A.PGDTE;M.Phil.Ph.D. | Head & Assoc Professor |
| Dr. Shinde S.V. | M.A.B.Ed..M.Phil. Ph.D. | Assist. Professor |
| **MARATHI** | | |
| Dr. Parkale J.D. | M.A;B.Ed.SET, NET;Ph.D. | Head & Professor |
| Shri Suryawanshi V.B. | M.A.SET | Assoc.Professor |
| **HINDI (U.G.&P.G.)** | | |
| Dr. Lokhande N.T. | M.A.NET,M.Phil.T.Ph.D. | Head & Asso. Professor |
| **HISTORY(U.G.&P.G.)** | | |
| Dr. Magar D.G. | M.A.B.Ed. Ph.D. | Head & Assoc. Professor |
| Dr. Waghmare S.T. | M.A.B.Ed. Ph.D. | Asst. Professor |
| Dr. Pawar S.U. | M.A.B.Ed.,Ph.D.,SET | Asst. Professor |
| **GEOGRAPHY** | | |
| Dr. Gujar S.N. | M.A.B.Ed.NET,Ph.D. | Head & Professor |
| Dr. Tate C.V. | M.A.M.Ed.NET,Ph.D. | Asst. Professor |
| Dr. Londhe C.B. | M.A.B.Ed.M.Phil.Ph.D. | Asst. Professor |
| Miss Patil S.S. | M.A. NET | Asst. Professor |
| Shri Sonawane R.L. | M.A. NET | Asst. Professor |
| **ECONOMICS** | | |
| Dr. Nalawade A.S. | M.A;Ph.D. SET | Head & Assoc. Professor |
| **PSYCHOLOGY** | | |
| Dr. Mane R.P. | M.A.Ph.D. | Head & Asst. Professor |
| **PHILOSOPHY** | | |
| Dr. Mulik B. S. | M.A. Ph.D. | Head & Asst. Professor |
| **POLITICAL SCIENCE** | | |
| Dr. Awad V.M. | M.A.Ph.D. | Head & Asst. Professor |
| **PHYSICAL EDUCATION** | | |
| Shri Kore K. K. | M.P.Ed. | Physical Director |
| Shri Kokate D.A. | M.A.M.P.Ed. | Asst. Professor |
| **COMMERCE** | | |
| Dr. Gaikwad R.L. | M.Com.SET, Ph.D. | Head & Professor |
| Dr. Salunkhe B.S. | M.Com.SET,Ph.D. | Professor |

| Name of the Department & Teacher | Qualifications | Designation |
|---|---|---|
| **M.Sc. Agrochemical & Pest Management** | | |
| Dr. Kamble D. R. | M.Sc;Ph.D. | Head |
| **ELECTRONICS (U.G.& P.G.)** | | |
| Prof. Tilekar S.K. | M.Sc.M.Phil.Ph.D. | Head&Professor(UG&PG) |
| Shri. Kumbhar R.H. | M.Sc. | Associate Professor |
| Shri. Lohar P.A. | M.Sc.NET | Asst. Professor |
| Dr. Relekar A.S. | M.Sc.NET.Ph.D. | Asst. Professor |
| **PHYSICS** | | |
| Dr. Pawar C.S. | M.Sc. B.Ed. Ph.D. | Head&Associate Professor |
| Dr. Babar A.R. | M.Sc. Ph.D. | Assoc. Professor |
| **CHEMISTRY** | | |
| Dr. Deokar S.S. | M.Sc; SET, Ph.D. | Head&Associate Professor |
| Dr. Kamble D.R. | M.Sc; Ph.D. | Asst. Professor |
| **MATHEMATICS** | | |
| Shri Shinde P.B. | M.Sc. B.Ed. SET | Head & Asst. Professor |
| **STATISTICS** | | |
| Miss. Inamdar R.A. | M.Sc; SET | Head & Asst. Professor |
| **BOTANY** | | |
| Dr. Satpute S.M. | M.Sc. B.Ed. Ph.D. | Head & Asst. Professor |
| **ZOOLOGY** | | |
| Dr. Bansode S.G. | M.Sc.Ph.D. | Head & Professor |
| **LIBRARY** | | |
| Shri Patil D.S. | M.Lib.Inf&Sci SET, M.Phil | Librarian |
| Shri Surve D.D. | B.Lib. | Asst. Librarian |
| **ENVIRONMENTAL STUDY** | | |
| Shri Salunkhe B.L. | M.A.B.Ed. | Co-ordinator |
| **YCMOU STUDY CENTRE** | | |
| Dr. Mulik B.S. | M.A. Ph.D. | Co-ordinator |

## Junior College Staff

| Name of the Teacher | Subject |
|---|---|
| Shri. Shendage A.V. | Agriculture Sci. & Tech. |
| Shri. Deshmukh A. G. | English |
| Miss Patil P.P. | English |
| Shri. Shinde A.P. | English |
| Shri. Phule M. P. | Marathi |
| Shri. Yaichal R.A. | Marathi |
| Shri. Sayyad Z.S. | Hindi |
| Shri. Jadhav S.S. | History |
| Shri. Jadhavar B.B. | Economics |
| Sou. Shendage U.S. | Economics |
| Shri. Bodake E.N. | Psychology |
| Shri. Kangude S.H. | Mathematics |
| Shri. Jadhav P.A. | Mathematics |
| Miss Jadhav S.S. | Commerce |
| Shri. Khatmode N.A. | Commerce |
| Sou. Salunkhe R.S. | Physics |
| Miss Shinde J.D. | Physics |
| Miss Shinde R.B. | Physics |
| Shri Awatade S.P. | Physics |
| Shri. Gore S.J. | Chemistry |
| Miss Dharurkar A.V. | Chemistry |
| Shri. Chavan S.P. | Chemistry |
| Miss. Survase M.R. | Chemistry |
| Miss Kshirsagar G.N. | Biology |
| Miss Rahate P.D. | Biology |
| Miss Nalawade P.H. | Biology |
| Shri. Jadhav R.B. | Electronics |
| Shri. Gurav D.N. | Electronics |
| Shri. Zirpe S.D. | Animal Sci & Dairying |
| Shri. Thavare S.D. | Animal Sci & Diarying |
| Dr. Bhosale B.S. | Physical Education |

## H.S.C. Vocational Course Staff

| Name of the Teacher | Subject |
|---|---|
| **Electronics Technology** | |
| Shri Mote D. K. | Lecturer |
| **Electrical Technology** | |
| Shri Mane J.A. | Lecturer |
| **English** | |
| Shri Patil S. S. | Lecturer |
| **Marathi** | |
| Shri Kadam N.P. | Lecturer |
| **Foundation Course** | |
| Shri. Revade A.V. | |
| **Environment** | |
| Shri Sathe A.M. | Co-ordinator |
| **Physical** | |
| Dr. Bhosale B.S. | Lecturer |
| **Non Teaching** | |
| Shri. Jagdale Y.S. | Store Keeper-cum-Clerk-Hamal-cum-Peon |

## Non-Teaching Staff

### CLASS II

| | |
|---|---|
| Shri Bamane R. A. | Registrar |

### CLASS III

| | |
|---|---|
| Shri. Malusare Y. L. | Office Superintendent |
| Shri. Yadav S. R. | Head Clerk |
| Shri Sathe N. E. | Sr. Clerk |
| Shri. Nair R. R. | Jr. Clerk |
| Miss Mirajdar S. V. | Steno |
| Shri. Kale M. M. | Library Clerk |
| Shri. Jadhav M. P. | Jr. Clerk |
| Shri. Pawar B. D. | Library Clerk |
| Shri. Rajmane M. P. | Jr. Clerk |
| Sou. Kate S.B. | Lab. Assistant |
| Shri. Sathe M. R. | Lab. Assistant |
| Shri. Gaikwad R. D. | Jr. Clerk |
| Shri. Patil A. H. | Jr. Clerk |

### CLASS IV

| | |
|---|---|
| Shri. Jadhav V. B. | Lab. Attendent |
| Shri. Pise S. M. | Lab. Attendent |
| Shri. Banpatte S. V. | Lab. Attendent |
| Shri. Gaikwad S. C. | Lab. Attendent |
| Shri. Gaikwad M. L. | Lab. Attendent |
| Shri. Kadam B. B. | Lab. Attendent |
| Shri. Shaikh K. B. | Lab. Attendent |
| Shri Potdar D. R. | Lab. Attendent |
| Shri. Shaikh I. B. | Lib. Attendent |
| Shri. Varkute B. T. | Lib. Attendent |
| Shri. Jadhav R. V. | Lib. Attendent |
| Shri. Jadhav S. M. | Lib. Attendent |
| Shri. Chavan B. V. | Lib. Attendent |
| Shri. Salunkhe S. K. | Lib. Attendent |
| Shri. Bhosale H. B. | Lib. Attendent |
| Shri. Munde S. B. | Lib. Attendent |
| Shri. Narsale G. J. | Peon |
| Shri. Kate B. H. | Peon |
| Shri. Nadaf A. R. | Lab. Attendent |
| Shri. Durane A. R. | Lab. Attendent |
| Shri. Mane R. S. | Peon |
| Shri. Khandagale J. S. | Peon |
| Miss. Yanjade D. S. | Peon |
| Shri. Jadhav U. J. | Peon |
| Shri. Khan S. A. | Peon |
| Shri. Phule A. R. | Peon |
| Shri. Shinde S. N. | Peon |

# POST GRADUATE DEPARTMENTS UNDER SCIENCE FACULTY

## P.G. Department of Electronics

Course Offered : M.Sc. Electronics
Ph.D. in Electronics

Intake Capacity : M.Sc. 24,
B.Sc. with Electronics as the principal subject or subsidiary / interdisciplinary) applied / B.Sc. (Entire Computer Science)

Fee Structure : As per university rules

Specialization : In second year the student can opt for elective papers of the following specialization.

• Embeded System Design • Communication Electronics • VLSI Design

**Facilities :** Well equipped separate laboratory with following sophisticated equipments.

- VLSI Trainer, PLC Trainer
- Embedded Trainer
- Universal Micro Controller Programmer
- Computers
- Broad Band Facility
- Advance Micro Controller Trainer
- Digital Communication Trainer
- ECG, EMG, EEG Trainer
- Campus Interview
- Instrument for Research Activities
- VLSI Lab in collaboration with ACTEL, USA
- VLSI Mixed Signal Lab, Cypress Semiconductor, USA

**Research Facilities:**

- Laboratory is recognised by Solapur University, Solapur for research
- The research programs such as M.Phil & Ph.D. are onging
- Research projects in collaboration with industries.

**Research Project :**

- UGC sponsored one major & four minor research projects are completed.
- Employment Opportunities:
- Electronics, Telecommunication and IT industries.
- Process control and manufacturing industries.
- Agricultural based industries.
- Research and development laboratories.
- Employment as teacher in private and Govt. organization.

Head : Prof. S. K. Tilekar

## P. G. Department of Agro Chemical & Pest Management

Course Offered : M.Sc. Agro-Chemicals and Pest Management

Intake Capacity : 24

**Eligibility :**

B.Sc. with Chemical / Biotechnology / Botany / Zoology / Microbiology / Agriculture / Horticulture / Plant Protection / Biochemistry.

Fee Stucture : As per University rules.

**Facilities :**

1. Well equipped separate laboratory for Chemistry and Life Sciences.
2. Highly qualified and experienced core and visiting faculty with full time dedication for consistent and continuous guidance to the students.
3. Ravindranath Tagore Library furnished with reference books, journals, e-books, study room, night study room, etc.
4. Computers, Internet facility (Broad Band facility).
5. Hostel facility for boys and girls.
6. Scholarships and freeships to the socially and economically reserve category students as per the rules of Govt. of Maharashtra and Govt. of India.
7. Industrial Training
8. Field Visits
9. On Job Training

**Employment Opportunities:**

- Chemical fertilizer industries
- Pesticide industries.
- Bio-fertilizer industries
- Macro and micro nutrient industries.
- Sericulture industries
- Apiculture industries
- Marketing of fertilizers and pesticides
- Counselling of farmers
- Soil, leaf & water testing lab
- Agro based Lab
- Tissue Culture Lab

Head : Dr. D. R. Kamble

## P.G. Department under Arts Faculty

Co-ordinator Dr. H. K. Awatade

| Dept. | CLASSES | HEAD |
|---|---|---|
| English | M.A. - English | Dr. H. K. Awatade |
| Hindi | M.A. - Hindi | Dr. N. T. Lokhande |
| History | M.A. - History | Dr. D. G. Magar |

## CERTIFICATE COURSES

| | |
|---|---|
| 01. A Certificate Course in Marathi Mudrit Shodhan | Marathi |
| 02. A Certificate Course in Anchoring Skill Development | Hindi |
| 03. Skill Development Course in Translation Studies | Englsih |
| 04. A Certificate Course in Financial Markets | Economics |
| 05. A Certificate Course in the Study of Historical & Tourist Places in and around Akluj | History |
| 06. A Certificate Course in Travel & Tourism | Geography |
| 07. A Certificate Course in Basic Accounting | Commerce |
| 08. A Certificate Course in Vermicompost | Zoology |
| 09. A Certificate Course in Haematology | Zoology |
| 10. A Certificate Course in Food Processing & Fruit Preservation | Botany |
| 11. A Certificate Course in Repair & Maintenance of Electric House Hold Appliances | Physics |
| 12. A Certificate Course in Water Analysis | Chemistry |
| 13. A Certificate Course in Tissue Culture | AGPM/Botany |
| 14. A Certificate Course in Use of latex Software | Mathematics |

V(A)

शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित

# शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

## महाविद्यालयातील विविध उपक्रम




















For Details Contact

Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj Tal. Malshiras Dist. Solapur 413101

☎ 02185-222088 | smmakj@yahoo.com | www.smmakluj.ac.in